# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १५.०७.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**वाडी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १४.०७.२०२६ चे २३.३० वा. ते २३.५० वा. चे दरम्यान, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, वेणा नगर रोडवरील शिव मंदीर जवळ एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे त्यांना प्राप्त वर्णनाचा ईसम दिसुन आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव बबलू दिवाकर वानखेडे, वय ३२ वर्षे, रा. आंबेडकर नगर, रमाबाई चौक, वाडी, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणून, आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री ऋषिकेश रेड्डी सिंगा रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (अती. कार्य. एम.आय.डी.सी. विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन मगर, पोउपनि. अमित बंडगर, ज्ञानेश्वर सानप, पोहवा. रोशन फुकट, दुर्गादास माकोडे, राहुल बोटरे व पोअं. विनोद कुंभलकर यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमना :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १५.०७.२०२६ चे ००.३० वा. ते ०१.३० वा. चे दरम्यान, कळमना पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना चिखली येथील एन.आय.टी. गार्डनजवळ एक ईसम अंधारात संशयीतरित्या दिसून आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विरेंद्र रामलाल यादव, वय २२ वर्षे, रा. आदिवासी प्रकाश नगर, गल्ली नं. ०५, कळमना, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आंत कंबरेत एक लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी विशाल भैसारे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. हनुमंत इंगळे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५,१२२ म.पो. का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १३.०७.२०२६ चे ११.०० वा. ते १९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट क्र. २६४/२६५, प्रसाद अपार्टमेंन्ट, फ्लॅट क्र. ३०२, खुरपूडे लॉन जवळ, अंबा नगर येथे राहणारे फिर्यादी हरीष जनार्दन बरडे, वय ५० वर्ष व त्यांच्या पत्नी असे दोघेही आपले राहते घराला कुलुप लावुन आप—आपले कामावर गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी कपाटाचे लॉकरमधून सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने किंमती ४,३६,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. कृष्णा साळुंके ८६२५०४८८०१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर:—** दिनांक १५.०७.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, अभिषेक शिवलाल डहाळे, वय २३ वर्षे व त्याचा सहकारी निलेश बबनराव बावणे वय ४० वर्षे, दोघेही रा. शिवोरा, नगर परिषद, कन्हान, तह. पारशिवनी, जि. नागपुर हे ठेकेदार नामे नितीन आष्टेकर याचे मार्फतीने पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत राजेश्वर नगर येथे एमएसईबी चे दुरूस्तीचे काम करीत होते. अभिषेक डहाळे हा इलेक्ट्रीक पोलवर चढून काम करीत असता, त्यास इलेक्ट्रीक करंट लागल्याने तो पोलचे ताराला लटकून राहीला. त्याचे दोन्ही हात भाजल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यास खाली उतरवून उपचारकामी बोरकर हॉस्पीटल व तेथून मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन अभिषेक डहाळे यास मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे मपोउपनि. आरती करंडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे पारडी :—** दिनांक १५.०७.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पारडी हद्दीत, पारडी—भंडारा रोडवरील पाच नं. नाकाचे विरूध्द दिशेला असलेल्या पानटपरीजवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३५ वर्षे, ज्यांनी अंगात मेहंदी रंगाची फुलबाहीची टि—शर्ट, निळ्या रंगाची बनियान, निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला व त्यावर ब्राऊन रंगाचा बेल्ट लावलेला तसेच, गळ्यात काळ्या रंगाचा धागा असलेल्या वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे पारडी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोहवा. धिरज पाली यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि. सचिन ठाकरे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे नविन कामठी</u> :–** कनीज फातमा मोहम्मद अकरम, वय २४ वर्षे, रा. बिबी कॉलोनी, कामठी, जि. नागपूर ह्या दिनांक ०३.०७.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग– सावळा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ३ इंच, केस– काळे लांब, अंगात– गुलाबी रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे मानकापूर</u> :–** कैलास किशोर रेड्डी, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. १३९, शबरी माता नगर, नटराज सोसायटी, नागपूर हे दिनांक ०४.०७.२०२६ चे १२.०० वा. पासुन पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग– सावळा, चेहरा– लांबट, बांधा– मध्यम, उंची– ६ फुट ३ इंच, केस– काळे, अंगात– ब्राऊन रंगाचा चेक्सचा शर्ट व निळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.


कनीज


कैलास

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट कं. ०३, नागपुर. | ३०३२५२ /२००७ | कलम १३५ भा.दं.वि. | मधू सुरजसिंग गवले, रा. भांडेवाडी राम नगर प्लॉट नं. बी/८१ महाराज यांचे घराजवळ, कळमना, नागपूर. | २१.०७.२०२६ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट कं. ०३, नागपुर. | ३०१४६६/ २००६ | कलम ३७९ भा.दं.वि. | दिपक राजेंद्रप्रसाद केशवानी, रा. विनाईराव देशमुख शाळे मागे, शांतीनगर, नागपूर. | २२.०७.२०२६ |
| ३. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट कं. ०३, नागपुर. | ३०५००७२ /२००३ | कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि. | १) दुर्गाप्रसाद महाविरप्रसाद तिवारी, रा. तिवारी भवन, भगवाघर चौक, सी.ए. रोड, बजेरीया, नागपूर.<br>२) कविता दुर्गाप्रसाद उर्फ पप्पू तिवारी, रा. सिध्देश्वर शाहुचे घरी किरायाने, लोधीपूरा, सी. ए. रोड, नागपूर. | ०४.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्रं. ०३, नागपुर. | ३०३८९४ /२००८ | कलम ३२४ भा.दं.वि. | राकेश चंदू हिरावानी, वय २९ वर्षे, रा. गंगा जमूना, पोलीस चौकी जवळ, लकडगंज, नागपूर. | २१.०७.२०२६ |
| ५. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्रं. ०३, नागपुर. | ३०५००४३ /२००३ | कलम १४३, १४७, १४९, ४५७, ४३५, ४२७ भा.दं.वि. | १) चंद्रप्रकाश छोटेलाल दुबे, वय ३० वर्षे, रा. लालगंज, दलालपूरा चौक, राष्ट्रीय सेवा शाळे समोर, नागपूर.<br>२) शेख अश्फाक अब्दुल गफुर, रा. सतरंजीपूरा, तेलीपूरा, सुनिल हॉटेल मागे, मजीर इन्जीनियर चे घरी किरायाने, नागपूर. | ०४.०८.२०२६ |
| ६. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्रं. ०३, नागपुर. | ३०४६०६ /२००७ | कलम ३०९ भा.दं.वि. | मोहम्मद हर्षद मुखत्यार अहमद, वय २६ वर्षे, रा. ज्योतिबा फुले नगर, अमरोल (यु.पी.), ह.मु. मोमीनपूरा, नागपूर. | २१.०७.२०२६ |
| ७. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्रं. ०३, नागपुर. | ३०१४६६ /२००६ | कलम ३७९ भा.दं.वि. | संतोष छोटेलाल शिर्के, वय ३२ वर्षे, रा. पाचपावली, ठक्करग्राम, दिलीप नहारकर याचे घराजवळ, पाचपावली, नागपूर. | २१.०७.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## <u>वाहतुक शाखेची प्रेसनोट</u>

वाहतूक परिमंडळ इंदोरा नागपूर शहर हद्दीतील अंसारी इरेक्टर्स कंपनी तर्फे भोला शाळा ते कडबी चौक पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम ३० दिवसात करण्यात येणार आहे. काम सुरळितपणे पार पाडण्यासाठी वाहनांची वाहतूक तात्पुरती वळविणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**मोमिनपूरा ते कडबी चौकाकडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- मोमिनपुरा ते कडबी चौकाकडे जाणारी वाहतूक भोला शाळा येथुन उजवे वळण घेवून बेलिशॉप क्वॉर्टर मार्गे कामठी रोड येथुन डावे वळण घेवून कडबी चौकाकडे जाईल.

**कडबी चौक ते मोमिनपूरा कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- कडबी चौक ते मोमिनपूरा चौकाकडे जाणारी वाहतूक ही कडबी चौक येथुन डावे वळण घेवून बेलीशॉप क्वॉर्टर येथुन उजवे वळण घेवुन बेलीशॉप क्वॉर्टर मार्गे भोला शाळा येथुन डावे वळण घेवून मोमिनपूरा कडे जाईल.

**सदर अधिसुचना दिनांक १६.०७.२०२६ रोजी पासून ते दि. १३.०८.२०२६ रोजी पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/—

( **आदित्य मिरखेलकर, भापोसे** )

पोलीस उप आयुक्त,वाहतुक,

नागपूर शहर